विंधणविहीर कार्यक्रम व वायुसंपिडक सुरुंग कार्यक्रम तसेच, जिल्हा परिषदांमार्फत व भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेमार्फत राबविण्यात येणा-या कार्यक्रमाकरिता आवश्यक असलेल्या साहित्याच्या खरेदीसाठी कायमस्वरुपी विभागीय भांडार खरेदी समितीचे गठण.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्र.ग्रापापु १००३/प्र. क्र.२४२/पापु.०७
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२
दिनांक- १ डिसेंबर,२००३.

वाचा:- (१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु १००१/प्र.क्र.२८५/पापु.०७ दिनांक- १२ जून, २००१.

(२) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांचे पत्र क्र.आवेधन/कक्ष-३/१३२/२००३, दिनांक-३०.६.२००३

प्रस्तावना-

विंधण विहिर कार्यक्रम व वायुसंपिडक सुरुंग कार्यक्रम तसेच जिल्हा परिषदांमार्फत व भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेमार्फत राबविण्यात येणा-या कार्यक्रमाकरिता आवश्यक असलेल्या सर्व प्रकारच्या साहित्याच्या खरेदीसाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत संदर्भीय क्र.१ येथील दिनांक १२ जून,२००१ च्या शासन निर्णयान्वये ९ सदस्यांची (अध्यक्षांसह) विभागीय भांडार खरेदी समिती गठीत करण्यात आली आहे.या विभागीय भांडार खरेदी समितीमध्ये भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेमधील सहसंचालक (आवेधन) व मुख्य आवेधन अभियंता (मुख्यालय) यांचा समावेश करावा अशी विनंती संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे यांनी संदर्भातील क्र.२ येथील दि.३०.६.२००३ च्या पत्राने केली होती.संचालकांनी केलेल्या विनंतीनुसार विभागीय भांडार खरेदी समितीमध्ये सहसंचालक (आवेधन) व मुख्य आवेधन अभियंता यांचा सदस्य म्हणून समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन संदर्भिय दिनांक १२ जून,२००१ च्या शासन निर्णयान्वये गठित करण्यात आलेल्या **"विभागीय भांडार खरेदी समितीमध्ये"** पुढील अधिका-यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

| | |
|---|---|
| (१) सहसंचालक (आवेधन), भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे | सदस्य |
| (२) मुख्य आवेधन अभियंता,भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे | सदस्य |

२. विभागीय भांडार खरेदी समितीमध्ये वरील अधिका-यांचा सदस्य म्हणून समावेश केल्याने समितीची रचना आता पुढीलप्रमाणे राहील:-

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सह सचिव/उप सचिव | (जिल्हा परिषद आस्थापना सांभाळणारे-पापु.०७) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | अध्यक्ष |
| २ | संचालक | भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे | सदस्य |
| ३ | मुख्य कार्यकारी अधिकारी | जिल्हा परिषद,नाशिक | सदस्य |
| ४ | सहसंचालक | उद्योग संचालनालय,मुंबई | सदस्य |
| ५ | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | जिल्हा परिषद,ठाणे | सदस्य |
| ६ | सहसंचालक (आवेधन) | भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे | सदस्य |
| ७ | मुख्य आवेधन अभियंता | भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे | सदस्य |
| ८ | वरिष्ठ खोदन अभियंता (मुख्यालय) | भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे | सदस्य |
| ९ | कार्यकारी अभियंता | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद,औरंगाबाद | सदस्य |
| १० | अवर सचिव (पापु.१५) | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य |
| ११ | कक्ष अधिकारी (पापु.०७) | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य -सचिव |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(सुधाकर ज्ञा.बोबडे)**
**कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
२. मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
३. प्रधान सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई.
४. सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई.

D:\year 1003\c.r.242-1003.doc

५. उप सचिव (श्री.ठाकरे), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई.
६. संचालक,भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे.
७. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नाशिक.
८. सहसंचालक,उद्योग संचालनालय,मुंबई.
९. मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद, ठाणे
१०. सहसंचालक (आवेधन),भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे
११. मुख्य आवेधन अभियंता (मुख्यालय),भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे.
१२. वरिष्ठ खोदन अभियंता (मुख्यालय),भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे.
१३. कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद,औरंगाबाद.
१४. प्रादेशिक मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१५. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद (नाशिक वगळून सर्व)
१६. जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)
१७. मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद (ठाणे वगळून सर्व)
१८. कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद (औरंगाबाद वगळून सर्व)
१९. प्रादेशिक उप संचालक,भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
२०. जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक,भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
२१. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई.
२२. अवर सचिव,कार्यासन पापु-१५,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
२३. विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासन अधिकारी
२४. निवडनस्ती,कार्यासन पापु.०७,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई.